महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय
१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१
दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी. क्र.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/उमाशि ४ /एनएसएस/पुवि/२०१६-१७/ 3648 दिनांक :- 02 /०६ /२०१७

E 2 JUN 2017

प्रति,
सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक ,
व एन एस एस समन्वयक,
उच्च माध्यमिक विद्यालये/कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे / सोलापूर /अहमदनगर.

**विषयः- एन एस एस योजनेच्या माध्यमातून इ. १२ वी ची पुस्तके गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यासाठी जमा करणेबाबत.**

संदर्भ:- दि.११.११.२०१६ रोजी शाहू मंदिर पुणे येथील विभागीय एन एस एस च्या कार्यशाळेत दिलेल्या सूचना.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, पुणे , सोलापूर, अहमदनगर या पुणे विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ३ जिल्हयांमधील इ. १२ वी ची जूनी पुस्तके व इतर उपयुक्त संदर्भ साहित्य जमा करुन , ती पुस्तके एन एस एस योजनेच्या माध्यमातून समन्वयकांच्या मार्फत स्थानिक पातळीवरील शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करणेबाबतची संकल्पना वेळोवेळी मेळाव्यांमध्ये व्यक्त करण्यात आली होती.

त्या अनुषंगाने आपण व आपल्या अधिनस्त कार्यरत असलेले सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून इ. १२ वी ची पुस्तके आपल्या स्तरावर जमा करण्यात यावीत, पुस्तके जमा झाल्यानंतर त्याबाबतची संख्यानिहाय आकडेवारी कृपया तालुकानिहाय / जिल्हानिहाय / विभागीय समन्वयकांना व प्रस्तुत कार्यालयास कळविण्यांत यावी, त्यानंतर जमा झालेली पुस्तके वाटप करणेबाबत नियोजन काही स्वयंसेवी संस्था व राष्ट्रीय सेवा योजना पुणे विभाग यांच्या वतीने करण्यात येणार आहे. तरी सदरचे कामकाज हे पूर्णतः सामाजिक बांधिलकी व गोर गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने करण्यात येणार आहे, हे लक्षात घेवून त्यामध्ये आपण सर्वांनी निश्चित चांगल्याप्रकारे योगदान देण्याची आवश्यकता आहे.

दि. ०९ जून २०१७ रोजी इ. १२ वी च्या गुणपत्रिकांचे वाटप संबंधित कमवि मधून करण्यात येणार आहे. त्यावेळी सर्व संबंधित घटकानी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून या उपक्रमाचे महत्व व आवश्यकता विद्यार्थ्यांना सांगावे व जास्तीत जास्त पुस्तके व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावीत.

तसेच ज्या शाळांच्या मध्ये इ. १० वी चे वर्ग आहेत, अशा शाळेच्या मुख्याध्यापकांनी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांची पुस्तके व शालोपयोगी साहित्य विद्यार्थ्यांना पालकांना आवाहन करुन, प्राप्त करुन घ्यावीत.

MRaut 2.6.17

(मिनाक्षी राऊत),
समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना तथा
सहा. शिक्षण संचालक
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, यांचे कार्यालय

प्रत माहितीसाठी :- शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जि.प. पुणे / सोलापूर /अहमदनगर.
प्रत कार्यवाहीसाठी :- प्रा.मदन सुर्यवंशी, पुणे ९८५०६४१०१८, प्रा.कैलास रहाणे, अहमदनगर-९९२२२२४३९२, प्रा.लक्ष्मण राख, सोलापूर ९४२१०३०१९७

प्रत माहितीस्तव सविनय सादर :- मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे १.